# मुंबईकर उद्योजकाला इंग्लंडमध्ये पुरस्कार

म. टा. प्रतिनिधी



उद्योग क्षेत्रातील आयकॉन लक्ष्मी मित्तल यांच्या पावलावर पाऊल टाकत अनेक भारतीय ब्रिटीश उद्योग क्षेत्रात बस्तान बसवत आहेत. मूळ मुंबईकर असलेले सुधाकर प्रभू आणि ब्रिटनमधील डॉ. फ्रिशमन यांच्या भागीदारीतल्या 'पेल फ्रिशमन' या इंजिनीरिंग उद्योग समूहाला यंदा 'क्विन्स अवॉर्ड' देण्यात आला आहे. हा इंग्लंडमधील व्यावसायिक क्षेत्रातला सर्वोच्च पुरस्कार मानला जातो.

पुरस्कार विजेत्यांचे कौतुक करण्यासाठी राणी एलिझाबेथ यांनी बकिंगहॅम पॅलेसमध्ये स्वागतसमारंभ आयोजित केला होता. कंपनीचे संचालक तुषार प्रभू हे यावेळी उपस्थित होते. 'पेल फ्रिशमन' ही बहुउद्देशीय कंपनी गेली ८० वर्षे इमारती, पूल, रेल्वे, एअरपोर्ट, बंदरे, आरोग्य, वीजपुरवठा, पाणीपुरवठा, प्रदूषण निवारण या क्षेत्रांतील बांधकामांत कार्यरत आहे.

या समूहाची मुंबईतील शाखा 'फ्रिशमन प्रभू इंडिया' गेली दहा वर्षे कार्यरत आहे. त्यांनी गोव्यातील हॉस्पिटल, नागपूरचा फ्लायओव्हर, मुंबई-पुणे एक्सप्रेस वे यांसारखे मोठे प्रकल्प यशस्वीपणे राबवले आहेत. कंपनीच्या सध्याच्या कामात दिल्ली एअरपोर्ट व मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा समावेश आहे.